# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेस नोट दि ०६/०८/२०२२

**राजस्थान येथुन पिंपरी चिंचवड परीसरात मोठया प्रमाणात अफूची बोंडाचा चुरा (पॉपी स्ट्रॉ) हा अंमली पदार्थ आणून गॅस एजन्सीच्या आड विक्री करणारे आतरराज्य बिष्णोई टोळीचा पडदा फाश.**

एक देशी बनावटीचे पिस्टल, तीन जिवंत काडतुसह ११० किलो पॉपी स्ट्रॉ व अफिम सह ०७ आरोपींवर अंमली पदार्थ विरोधी पथकाची धडक कारवाई

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुन छपुन होणारी अंमली पदार्थाची विक्री, साठवणुक व वाहतुकीस पूर्णपणे प्रतिबंध व्हावा याकरिता मा. पोलीस आयुक्त श्री. अंकुश शिंदे यांनी सूचना दिल्या. त्यानुसार सहा. पोलिस आयुक्त गुन्हे-१ श्री. पद्माकर घनवट व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश पवार यांनी वेळोवेळी अमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखेतील पोलिस अधिकारी व अंमलदार यांना सूचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्या प्रमाणे दि. ०५/०८/२०२२ रोजी श्री. सतीश पवार यांनी याचे अधिपत्याखाली सपोनि प्रशांत महाले व पोउपनि राजन महाडिक यांचे दोन वेगवेगळी पथके तयार करुन अंमली पदार्थाची तस्करी करणा-यांची माहिती काढणे व रेकॉर्ड वरील आरोपी यांना चेक करण्याकरिता वाकड, हिंजवडी पोलिस स्टेशन चे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत रवाना केले. दोन्ही पथके पेट्रालिंग करीत असतांना **पोलिस अंमलदार प्रदीप शेलार व संदीप पाटील** यांना त्यांचे बातमीदारा मार्फत जांभे, सांगावडे गावाच्या हद्दीमध्ये एक इसम हा नशा करण्याकरीता लागणा-या अफूचे बोंडाचा डूडा चुरा(पॉपी स्ट्रॉ). बाळगुण त्याची विक्री करीत असल्याबाबत खात्रीशीर बातमी मिळाली. त्याप्रमाणे मिळालेल्या गोपनीय बातमी प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश पवार, सपोनि महाले आणि पोउपनि महाडिक यांचेटीमसह जांभे ,सांगवडे गावाच्या हदीत बातमीचे ठिकाणी छापा मारला असता सदर ठिकाणी एक पिवळे रंगाचा **भारत गॅस टेम्पोचे ड्रायव्हर सीटवर व मोकाशी हाईटचे टेरेसवरील रुममध्ये १८,५९,४९५/- रुपये किंमतीचा ११० किलो अफूचे बोंडाचा डूडा चुरा(पॉपी स्ट्रॉ), ५६ ग्रॅम अफिम व एक देशी बनावटीचे पिस्टल तीन जिवंत काडतुसह** आरोपी क्र.१) जयप्रकाश साईराम खीचड वय २४ राहणार तिसरा मजला मोकाशी हाईट सांगवडे, ता. मावळ जि. पुणे आरोपी क्र. २) महेश कुमार उर्फ श्याम बाखाराम बिष्णोई व आरोपी क्र. ३) विकास मोहनराम बिष्णोई यांचे ताब्यात मिळुन आला.

सदरचा अफूचे बोंडाचा डूडा चुरा(पॉपी स्ट्रॉ) व अफिम अंमली पदार्थ हा पाहिजे आरोपी आरोपी क्र.४) पप्पू उर्फ भगवानराम खमुराम बिष्णोई रा. मोकाशी हाईट सांगवडे, ता. मावळ जि. पुणे मुळ रा. जोधपुर राज्यस्थान व आरोपी क्र. ५) सुरेशकुमार जगलामाराम सियाक बिष्णोई दोघे रा. मोकाशी हाईट सांगवडे, ता. मावळ जि. पुणे मुळ रा. जोधपुर राज्यस्थान यांचा असुन तो त्याना सुरेशकुमार याचा भाऊ आरोपी क्र. ६) महिपाल जगलामाराम सियाक बिष्णोई हा राज्यस्थान येथुन घेवुन दिला आहे. तसेच सदर माल हा आरोपी क्र.०७) विकास डाका बिष्णोई रा. मोकाशी हाईट सांगवडे, ता. मावळ जि. पुणे मुळ रा. जोधपुर राज्यस्थान याचे मदतीने पिंपरी चिंचवड परीसरात विक्री करीत होते. सदरचे आरोपी क्र ०१ ते ०७ आरोपींविरुद्ध शिरगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.२८/२०२२ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क),१५(क),१७(ब),२९ व आर्म ॲक्ट कलम ३(२५), महा.पो.अधि.कलम ३७(१) सह१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री अंकुश शिंदे सो. मा.अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे सो., मा.पोलीस उपायुक्त, गुन्हे, डॉ काकासाहेब डोळे सो., मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. पद्माकर घनवट सो. यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सतीश पवार, सपोनि श्री प्रशांत महाले, पोउपनि श्री राजन महाडीक व पोलीस अमंलदार बाळासाहेब सुर्यवंशी, प्रदिप शेलार,दिनकर भुजबळ, संदिप पाटील,मयुर वाडकर,संतोष भालेराव, मनोज राठोड, प्रसाद कलाटे, दादा धस, अशोक गारगोटे, यांनी केली आहे.

(श्री. पद्माकर घनवट)
सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१
पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner